गीत ः हा चंद्र तुझ्यासाठी अल्बम ः बेधुंद

गायक ः स्वप्निल बांदोडकर शब्द ः चंद्रशेखर सानेकर संगीत ः अजय अतुल

हा चंद्र तुझ्यासाठी ही रात तुझ्यासाठी
आरास ही ताऱ्यांची गगनात तुझ्यासाठी
कैफात अशावेळी मज याद तुझी आली ये ना
मोहरत्या स्वप्नांना घेऊन ये तु
थरथरत्या स्पर्शांना घेऊन ये तु
अनुरागी रसरंगी होऊन ये तु
नाजुकशी एक परी होऊन ये तु

वर्षाव तुझ्या तारूण्याचा रिमझिमता माझ्यावरी होऊदे
रेशीम तुझ्या लावण्याचे चंदेरी माझ्यावरी लहरू दे
नाव तुझे माझ्या ओठावर येते
फुल जसे की फुलताना दरवळते
इतके मज कळते अधुरा मी येथे
चांदरात ही बघ निसटुन जाते
बांधीन गगनास झुला जर देशील साथ मला ये ना
मोहरत्या स्वप्नांना घेऊन ये तु
थरथरत्या स्पर्शांना घेऊन ये तु
अनुरागी रसरंगी होऊन ये तु
नाजुकशी एक परी होऊन ये तु

हे क्षण हळवे एकांताचे दाटलेले माझ्या किती भवताली
चाहुल तुझी घेण्यासाठी रात्र झाली आहे मऊ मखमाली

आज तुला सारे काही सांगावे
बिलगुनिया  तु मजला ते ऐकावे
होऊन कारंजे उसळे मन माझे
पाऊल का अजुनी ना तुझे  वाजे
जीव माझा व्याकुळला
दे आता हात मला...येना
मोहरत्या स्वप्नांना घेऊन ये तू   ये ना
थरथरत्या स्पर्शांना घेऊन ये तु  ये ना
अनुरागी रसरंगी होऊन ये तु
नाजुकशी एक परी होऊन ये तु